



नवी आशा नवी दिशा

# सार्वमत



## राहाता बाजार समितीत डाळिंब १५५ रुपये किलो

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहता कृषी उत्पन्न बाजार समितीत डाळिंबाला प्रति किलोला १५५ रुपये भाव मिळाला. राहाता बाजार समितीत सोमवारी डाळिंबाच्या १३०९ कॅरेटची आवक झाली. डाळिंब नंबर एकला १२१ ते १५५ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर दोनला ८१ ते १२० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर तीनला ४६ ते ८० रुपये भाव मिळाला. गाडी नंबर चारला दहा ते ४५ रुपये भाव मिळाला.






## महत्त्वाचे

### कोल्हार उपबाजारात गहू २६00 रुपये क्विंटल

**कोल्हार (वार्ताहर)–** राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक येथील उपबाजारात सोमवारी गव्हाची ३३ क्विंटल आवक झाली. गहू कमीत कमी २५५० रुपये तर जास्तीत जास्त २६०० रुपये प्रतीक्विंटल दराने खरेदी करण्यात आला. तसेच कोल्हार उपबजारात हरभऱ्याची १ क्विंटल आवक झाली. हरभरा ५३०० रुपये क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. सोयाबीनची ५ क्विंटल आवक झाली. सोयाबीन सरासरी ४२३१ रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करण्यात आल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

### वांबोरीत कांदा १८00 रुपये

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** सोमवार २६ मे रोजी



वांबोरी उपबाजारात झालेल्या कांदा लिलावात ४ हजार २८४ कांदा गोण्याची आवक झाली. एक नंबरचा कांदा १३०५ ते १८०० रुपये, दोन नंबरचा कांदा ९०५ ते १३०० रुपये तर तीन नंबरचा कांदा १०० ते ९०० रुपये भावाने विकला गेला. तसेच गोल्टी कांद्याला ७०० ते १२०० रुपये भाव मिळाला. अपवादात्मक ३१ कांदा गोण्यांना १९०० रुपये भाव मिळाला.

### योगीराज सद्‌गुरु गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताह

# भाविकांची सर्वाधिक संख्या असलेला जगातील एकमेव सप्ताह- ना. विखे

**माळवाडगाव (वार्ताहर)–** योगीराज सद्गुरू गंगागिरी महाराज यांच्या परंपरेत सुरू असलेला हा अखंड हरिनाम सप्ताह जगातील भाविकांची सर्वाधिक संख्या असलेला एकमेव सप्ताह असल्याचे गौरवोद्गार जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी काढले.

श्रीरामपूर-वैजापूर तालुका हद्दीवरील गोदावरी तिरावर शनिदेवगाव सप्तक्रोशीतील बाजाठाण, चेंडूफळ, हमरापूर अवलगाव, भामाठाण, कमालपूर येथे श्रीक्षेत्र सरालाबेट गोदाधामचा योगीराज सद्गुरू गंगागिरी महाराज १७८ व्या सप्ताहाची तयारी प्रगतिपथावर सुरू आहे. या सप्ताह मैदान स्थळ पाहणी व कार्यालयाचे उद्घाटन जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, महंत रामगिरी महाराज यांच्याहस्ते रविवारी सायंकाळी ६ वाजता पार पडला. याप्रसंगी ना.विखे पाटील बोलत होते. सभास्थळी व्यासपीठावर जाण्यापूर्वी ना. विखे पाटील यांनी चौथऱ्यावर जाऊन शनी देवाचे मनोभावे दर्शन घेतले.

ना.विखे पाटील म्हणाले, योगीराज गंगागिरी महाराज यांच्या सप्ताहाचे लाखो भाविकांची बसण्याची पंगती भोजनाची व्यवस्था ग्रामीण भागातील सप्ताह परिसरातील गावोगावची मंडळी करतात. हे नियोजन, व्यवस्थापन कौशल्य पाहण्यासाठी आता विविध विद्यापीठांचे व्यवस्थापनशास्त्र विषयाचे अभ्यासक येत आहेत. सनातन हिंदू धर्मांची उज्ज्वल परंपरा पुढे नेण्याचे दायित्व महंत रामगिरी महाराज या सप्ताहाच्या माध्यमातून करत आहेत.

वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे म्हणाले, तालुक्याचा लोकप्रतिनिधी या नात्याने सप्ताह कमेटी सुचवील ती विकासकामे जबाबदारीने पार पाडेल. आपण सर्वांनी राजकीय जोडे बाजुला ठेवून या सप्ताहात काम करण्यासाठी झोकून घ्या. गिनीज बुकात नोंद झालेल्या वैजापूरच्या १७६ व्या सप्ताहाच्यावरती झेंडा कसा लागेल यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन आ. बोरनारे यांनी केले.

महंत रामगिरी महाराज म्हणाले, देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे झाली. हा तर १७८ वा सप्ताह आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापूर्वी एक शतक पूर्ण झाल्याची परंपरा या सप्ताहाची आहे. या कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी मंत्रिमहोदयांची उपस्थिती लाभल्याने शनिदेव सप्तक्रोशीत सप्ताहाच्या तयारीसाठी भाविकांत चैतन्यमय वातावरण निर्माण झाले. बेटाच्या विकासकामात विखे परिवाराचा मोठा सहभाग असतो. स्व.खासदार बाळासाहेब विखे पाटील यांनी यापूर्वी नियोजनात लोणी येथे सप्ताह केलेला आहे.

नामदार विखे-पाटील हे देखील सप्ताह मागणी करताहेत. या नियोजित सप्ताहाची जागा पूर्वी खाचखळग्याची होती. आता सपाटीकरण काम प्रगतिपथावर असल्याने प्रशस्त वाटत आहे. कमालपूर येथे पार्किंग व्यवस्था करण्यात येऊन बंधाऱ्यावरून भक्तगण पायी सप्ताहस्थळी येतील. येण्यासाठी बंधाऱ्याच्या दुरुस्तीची जी अडचण होती ती मंत्रीमहोदय दूर करणार आहे. या बंधाऱ्याप्रमाणेच नागमठाण पुलाला जोडणारा महांकाळवाडगावकडील रस्त्याचे काम सप्ताहापूर्वी हाती घेण्यात यावे. वैजापूर परिसरातील रस्ते विकास कामांची जबाबदारी आ.रमेश बोरनारे यांनी स्विकारली असल्याचे महाराज म्हणाले.

या कार्यक्रमास हरिशरणगिरी महाराज, संदीपान महाराज, योगेंद्रगिरी महाराज, भाजपा नेते दिनेश परदेशी, माजी सभापती अविनाश गलांडे, भाजपा उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, माजी नगराध्यक्ष संजय फंड, श्रीरामपूर तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, माजी तालुकाध्यक्ष दीपक पटारे, श्रीरामपूर बाजार समिती संचालक गिरीधर आसने, भाजपाचे तालुका सरचिटणीस डॉ.शंकर मुठे आदी उपस्थित होते.

**गोदाकाठी शनिदेवगाव सप्तक्रोशीत १७८ व्या सप्ताह कार्यालयाचे उद्घाटन**



### सप्ताहाआधी लगीन कमालपूर केटीवेअरचे दिवाळी-दसऱ्यात उच्च पातळी बंधाऱ्याचे

गेली वर्षानुवर्षे मरण यातना भोगत असलेल्या कमालपूर बंधाऱ्यावरून जीव मुठीत धरून दररोजचे परिसरातील शेतकरी, विद्यार्थी-विद्यार्थिनी, श्रीरामपूर, वैजापूर, गंगापूर तालुक्यांत येणारे जाणारे चाकरमाने, दूध, कांदा, भाजीपालावाले वाहनधारक यांनी यातना सहन केल्या. परंतु आज सप्ताह कार्यक्रम निमित्ताने रिमझिम पावसात प्रत्यक्षात राज्याचे जलसंपदामंत्री महोदयांनी आपल्या खात्याच्या अखत्यारीत येणाऱ्या अन् मोडकळीस आलेल्या बंधाऱ्यावरून प्रवास करून प्रत्यक्ष अनुभव घेतला. कमालपूरचे दिशेने ताफा दुसऱ्या टोकाला पोहचताच जलसंपदा विभागाचे संभाजीनगर अन् अहिल्यानगर विभागांचे उपस्थित अधिकाऱ्यांनी मंत्रिमहोदयांचे स्वागत केले. यावेळी आमदार रमेश बोरनारेही उपस्थित होते.या बंधाऱ्याचे तातडीने मजबुतीकरण करताना साईडचे कठडे सिमेंट कॉंक्रिटमध्ये मजबूत करण्याच्या सूचना देत. सप्ताह सुरू होण्यापूर्वी एक महिना अगोदर काम पूर्ण झाले पाहिजे,असा आदेश मंत्रिमहोदयांना दिला. उच्च पातळी बंधाऱ्याच्या कामासंदर्भातही अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. कार्यक्रमस्थळी आपल्या भाषणातून उच्च पातळी बंधारा प्रकल्पाचा उल्लेख करताना शासनाच्या बजेटपुढे या उच्च पातळी बंधाऱ्याचे २७२ कोटी रुपये काहीच नाही. काम तातडीने हाती घेण्यात येणार असल्याचे ना. विखे यांनी सांगितल्यावर उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

### मुंबई इंडियन्सचा विजयी सिलसिला सुरू राहण्यासाठी

# आकाश अंबानींची पाचव्यांदा साईचरणी हजेरी



**शिर्डी (प्रतिनिधी)–** रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेडचे अध्यक्ष आणि आयपीएलमधील मुंबई इंडियन्स संघाचे मालक आकाश अंबानी यांनी साईबाबां समाधीचे दर्शन घेतले. सोमवारी मुंबई इंडियन्स विरुद्ध पंजाब किंग्ज यांच्यात सामना होणार असल्याने मुंबईच्या विजयासाठी त्यांनी साईबाबांच्या चरणी प्रार्थना केली.

आयपीएल हंगाम सुरू झाल्यापासून अंबानी कुटुंबियांचा शिर्डी दौरा लक्षणीय ठरतो आहे. मुंबई इंडियन्स संघाच्या यशासाठी निता अंबानी, आकाश अंबानी तसेच स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव हे वेळोवेळी शिर्डीत येऊन साईदर्शन घेत आहेत. हंगामाच्या सुरुवातीला निता अंबानी यांनी दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यापूर्वी शिर्डीत येऊन साईबाबांच्या शेजारतीस हजेरी लावली होती. त्या दिवशी मुंबईचा विजय झाल्याने मंदिर परिसरात चाहत्यांनी त्यांचे अभिनंदन केले होते.

आकाश अंबानी यांची साईदर्शनासाठी ही पाचवी भेट ठरली. प्रत्येक सामन्याच्या पूर्वसंध्येला ते साईबाबांच्या चरणी नतमस्तक होत आहेत. यावेळी त्यांनी साई समाधीवर निळ्या रंगाची चादर अर्पण केली. दर्शनानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी त्यांचा सन्मान केला. आकाश अंबानी यांनी द्वारकामाई व गुरुस्थान मंदिरातही दर्शन घेतले.

# संगमनेर शहरासह ग्रामीण भागात जोरदार पाऊस



**संगमनेर (प्रतिनिधी)–** हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार संगमनेर शहरासह ग्रामीण भागात सोमवारी (दि.२६) सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास जोरदार पावसाने हजेरी लावल्याने जनजीवन विस्कळीत झाले. काही ठिकाणी रस्त्यांवर झाडे पडल्याने वाहतूक खोळंबली होती तर तारा पडल्याने वीजही गायब झाली होती.

महाराष्ट्रात रविवारी मान्सून वेळेआधीच दाखल झाला आहे. मात्र, त्यापूर्वीही अवकाळी पावसाने बॅटींग केल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झालेले आहे. अशातच हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार सोमवारी सायंकाळी पावसाने संगमनेर शहरासह ग्रामीण भागात जोरदार हजेरी लावल्याने रस्त्यांवर पाणीच पाणी दिसत होते. कोल्हार-घोटी राज्यमार्गावर पंचायत समिती कार्यालयाजवळ रस्त्यावर झाड पडल्याने वाहतूक खोळंबली होती. तारा तुटल्याने वीजही गायब झाली होती. तर ग्रामीण भागातही शेतांमध्ये पाणी साचले होते. यामध्ये साठवलेल्या कांद्याचे मोठे नुकसान झाले आहे. एकीकडे मान्सूनच्या आगमनाने शेतकऱ्यांना आनंद झाला असला तरी दुसरीकडे शेतपिकांचे आणि घरांचे नुकसान होत असल्याने ते संकटात सापडले आहे.

# भाचे भाजपमध्ये आले तरीही मामाबरोबर राजकीय संघर्ष सुरूच राहील

## डॉ. सुजय विखे पाटील यांची आ. सत्यजित तांबेंच्या भाजप प्रवेश चर्चेवर प्रतिक्रिया



**राहाता (प्रतिनिधी)–** विधान परिषद निवडणुकीत सत्यजित तांबे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली होती. त्यावेळी भाजपाने मैत्रीचा हात दिल्याचे बोलले जाते. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीसांनीही सत्यजित तांबेंना हेरल्याचे वक्तव्य केले होते. अलिकडे सत्यजित तांबे भाजपाच्या संपर्कात असल्याच्या चर्चेला उत्तर देताना डॉ. सुजय विखे म्हणाले, त्यांना भाजपात घेण्यास आमचा विरोध नाही. मात्र संगमनेर आणि स्थानिक विकासाच्या मुद्यावर आम्हाला जे योग्य वाटेल तेच होईल. भाचे आले, तरीही मामा बरोबर आमचा राजकीय संघर्ष सुरूच राहील.

खडकेवाके येथे माध्यमांशी डॉ. विखे बोलत होते. कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचे भाचे विधान परिषदेचे आमदार सत्यजित तांबे भाजपाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरू आहे. यावर डॉ. सुजय विखे पाटील यांनी सत्यजित तांबे यांच्या भाजपा प्रवेशाला विरोध नसल्याचे स्पष्ट केले. तसेच भाचे भाजपामध्ये आले तरी संगमनेरमध्ये मामांबरोबर राजकीय संघर्ष सुरूच राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वैष्णवी हगवणे प्रकरणाशी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव जोडणे हे चुकीचे आहे. अजित पवारांच्या विरोधात बोलणारे शिवसेना उद्धव ठाकरे आणि शरद पवार गटाच्या लोकांना लग्नाच्या पत्रिका येतच नाहीत. ज्यांना लग्नाच्या पत्रिका येत नसतील त्यांना दुसऱ्यांचा त्रास होत असल्याची मिश्कील टीका डॉ. सुजय विखे पाटील यांनी करीत अजित पवारांची पाठराखण केली.

लोकप्रतिनिधी असल्याने लोक लग्नकार्याला बोलवतात. मी पण मागे एका लग्नाला गेलो, नवरीच पळून गेली मग काय करणार. वैष्णवी हगवणे प्रकरण दुर्दैवीच आहे. पूर्वी हगवणे कुटुंबियाला कोणी ओळखत नव्हते. मात्र आता आमदार अन् मंत्र्यांपेक्षा अधिक प्रसिद्धी हगवणे कुटुंबाला मिळत आहे. काही लोक जाणीवपूर्वक हे करीत असल्याचे सुजय विखे म्हणाले. तसेच आता कायदा करावा लागेल की आरोपींना आपल्या कपड्यावर बिल्ला लावावा की तो आरोपी आहे. म्हणजे लोकप्रतिनिधींना देखील निर्णय घेणं शक्य होणार आहे, असेही सुजय विखे यावेळी म्हणाले.

मनसे आणि शिवसेना एकत्र येणार याबाबत संजय राऊत यांनी काही वक्तव्य केले असेल तर ते होणार नाही. पुढच्या दोन वर्षांत शिवसेनेत फक्त उद्धव ठाकरे आणि संजय राऊत हे दोनच लोक राहतील. जोपर्यंत तिथे संजय राऊत आहेत तोपर्यंत त्यांच्यासोबत कोणी जाणार नाही आणि त्या पक्षाला उभारीही मिळणार नाही. सध्या जी एकत्र येण्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे मग पक्षाचा नेता कोण होणार असे अनेक तर्कवितर्क काढले जात आहेत. त्यामुळे राऊत जे म्हणातायेत ते होणार नाही आणि जरी झाले तरीही महायुती त्यांच्यासमोर लढायला तयार आहे, असेही डॉ. विखेंनी स्पष्ट केले.

# राहुरी तालुक्यात अवकाळीचे दोन दिवसांपासून तांडव; मुळानदी झाली वाहती

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** राहुरी शहरासह गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यात सर्वदूर अवकाळी पावसाने विजेच्या कडकडाटासह दमदार हजेरी लावली. पुन्हा काल रात्रीच्या सुमारास शहरासह तालुक्यात तांडव केले असून यामुळे राहुरी तालुक्यातून वाहणारी मुळानदी वाहती झाली आहे.

गेल्या आठवड्यापासून राहुरी तालुक्यात कमी अधिक प्रमाणात मान्सूनपूर्व पावसाची संततधार सुरू आहे. रविवारी तालुक्याच्या पूर्व भागात ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने शेतमालाचे मोठे नुकसान झाले असून अनेक शेतात पाणी साचले आहे. त्यामुळे शेतातील चारापिके उद्ध्वस्त झाली असून काल पुन्हा सायंकाळच्या सुमारास मेघगर्जनेसह अवकाळी पावसाने चांगलेच तांडव केले. तालुक्याच्या पूर्व भागातील मांजरी, वळण, मानोरी, आरडगाव, तांदुळवाडी, केंदळ, कोंढवड परिसराला



या पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे.

या अवकाळी पावसामुळे ग्रामिण भागातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. सर्वत्र पाणी साचल्याने जनावरांना शेतातून चारा आणण्यासाठी शेतकरीबांधवांना मोठी कसरत करावी लागत आहे. काही शेतकऱ्यांच्या शेतात या पावसाचे पाणी साठल्याने शेताला तळ्याचे स्वरूप आले असून शेतातून पाणी काढून देण्यासाठी शेतकऱ्यांचा खटाटोप सुरू आहे. मात्र, अधूनमधून येणाऱ्या या मुसळधार पावसाने शेतकरी हतबल झाला असून शेतात पाणी साठल्याने घास पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे.

मुळानदीच्या उपनद्या असलेल्या देवनदी व करपरानदी यांच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस झाल्याने ओढे-नाले वाहू लागले आहेत. त्यामुळे या उपनद्यांना पाणी आल्याने मुळानदी ही मे महिन्यातच वाहती झाली आहे. राहुरी शहरात काल रात्री ८ वाजण्याच्या सुमारास मेघगर्जनेसह मुसळधार पावसाला सुरूवात झाली. या पावसामुळे शहरासह उपनगरात वीजपुरवठा खंडित झाला होता. शहरातील रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर पाणी वाहत असल्याने रस्त्यावरून प्रवास करताना नागरिकांचे हाल सुरू होते.

नवी आशा नवी दिशा सार्वमत

हे दैनिक मुद्रक व प्रकाशक राजेंद्र कृष्णराव सोनवणे यांनी श्रीरंग प्रकाशन प्रा.लि. यांच्याकरिता प्लॉट क्र. एन.११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर येथे मुद्रित करुन प्लॉट क्र. एन. ११, एम.आय.डी.सी, अहिल्यानगर ४१४१११ येथे प्रसिध्द केले आहे. ● संपादक- * अनंत सा. पाटील : ☎ (०२४२२) २२२४६४,२२२६२९. फॅक्स : २२२७९४. अहिल्यानगर कार्यालय : ☎ (०२४१) २४३११०३/०४ फॅक्स : (०२४१) २४३११०५. R.N.I Regi. No. 31816/1976. पोस्टाने पाठविण्याचा परवाना क्र. रजि. नं. बी.आय.आय./आर.एन.पी./एस.आर.पी./००३/२०२१-२३ (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे)